MARATHA VIDYA PRASARAK SAMAJ'S
**KARMAVEER ADV. BABURAO GANPATRAO THAKARE COLLEGE OF ENGINEERING**
KBTCOE
www.kbtcoe.org
Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University Vide Letter No: CA/1542
& Approved by AICTE New Delhi Vide Letter No: 740-89-32 (E) ET/98
AISHE Code - C-41622

MVPS/KBTCOE/office / 153 /2020-21 Date: 06/08/2020

# विद्यार्थ्यासाठी महत्त्वाची सुचना

या सुचनेव्दारे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रक परिक्षा/एसअॅण्डटी/५६१ दिनांक ५ ऑगस्ट २०२० नुसार महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर पदवी सर्व रेग्युलर विद्यार्थ्यांना सुचीत करण्यात येते की वरील परीपत्रकानुसार परिक्षा मे २०२० या परिक्षेचे निकाल जाहिर झालेले आहेत. परंतु जर विद्यार्थ्यास थेअरी (Improve) पेपर द्यावयाचे असले तर त्यासाठी विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या लिंक वर परिक्षा फॉर्म भरावयाचा आहे.

**www.unipune.ac.in → Examination→ Exam Form Online → Performance Improvement Examination APRIL/MAY 2020 → Link 1 & 2**

१. सदरील परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंट परीक्षा अर्ज हे ऐच्छिक(Optional) स्वरूपाचे आहेत.
२. सदर परिक्षा फॉर्मसाठी कोणतेही परिक्षा शुल्क आकारले जाणार नाही.
३. ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयात नियमित विद्यार्थी ( Regular Student ) प्रवेश घेतलेला आहे व मे - जून २०२० परीक्षासाठी अर्ज केलेला आहे, तेच विद्यार्थी परफॉर्मन्स इम्प्रुव्हमेंट परीक्षा अर्ज भरणेसाठी पात्र समजण्यात येतील.
४. ज्या विद्यार्थ्यांचे सम सत्रातील ( द्वितीय, चतुर्थ इ .) मे - जून २०२० परीक्षाचे निकाल गणितीय सूत्र वापरून जाहीर करण्यात आले आहेत आणि जे विद्यार्थी या निकालानंतर एक किंवा अनेक विषयांच्या गुणाबाबत असमाधानी आहे त्यांच्यासाठी सदर परीक्षेची ऐच्छिक ( Optional ) सुविधा देण्यात आलेली आहे.
५. सोबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रक परिक्षा/एसअॅण्डटी/५६१ दिनांक ५ ऑगस्ट २०२० चे पपित्रक.

To - erp - All heads - For Info. to all students

B.N.Shinde 6/8/2020
महाविद्यालय परिक्षा अधिकारी

6/8/2020
प्राचार्य

माहितीसाठी विभागप्रमुख :- **सर्व विभागप्रमुखांनी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे**

१) मेकॅनिकल इंजिनिअरींग
२) कॉम्प्युटर इंजिनिअरींग
३) इन्स्ट्रूमेंन्टेशन इंजिनिअरींग
४) इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग
५) सिव्हील इंजिनिअरींग
६) आय.टी इंजिनिअरींग
७) इंजिनिअरींग सायन्स
८) एम.बी.ए.

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.:२०२५६२१३४६
Website:www.unipune.ac.in.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(Formerly University of Pune)

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621343
E-mail: coe@unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एसअॅण्डटी/ ५६१ दिनांक : ०५/०८/२०२०

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.

**विषय** : कोव्हीड १९ च्या पार्श्वभुमीवर जाहीर करण्यात आलेल्या जुलै २०२० च्या (उन्हाळी) प्रथम ते अंतिमपूर्व वर्षांच्या निकालानंतर Performance Improvement साठी इच्छूक विद्यार्थ्यांच्या परीक्षा अर्जाबाबत.

**संदर्भ** : १. महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांचे दि. ०८.०५.२०२० चे पत्र.
२. विद्यापीठाचे परिपत्रक क्र. ९३ व ९४/२०२०, दि. १६.०५.२०२०.

महोदय/महोदया,

कोव्हिड - १९ महामारीच्या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन, परीक्षांचे आयोजन व निकाल जाहीर करण्यासंदर्भात महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग यांच्या दि. ०८.०५.२०२० च्या पत्रास अनुसरून विद्यापीठाने परिपत्रक क्र. ९३ व ९४/२०२०, दि. १६.०५.२०२० निर्गमित केलेली आहेत. सदर परिपत्रकास अनुसरून विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने मान्यता दिल्यानुसार प्रथम ते अंतिमपूर्व परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येत आहेत.

विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. ९३ व ९४ दि. १६.०५.२०२० मधील ब (४) मध्ये नमुद केल्यानुसार "जुलै २०२० परीक्षेच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना Performance Improvement हवी असल्यास त्याकरिता पुढील सत्रामध्ये संधी देण्यात येईल". सदर तरतुदीनुसार ज्या विद्यार्थ्यांना जुलै २०२० (उन्हाळी) प्रथम ते अंतिमपूर्व निकालामधील लेखी परीक्षेच्या विषयांना Performance Improvement हवी असेल त्यांच्याकरिता स्वतंत्र परीक्षा हिवाळी सत्राच्या परीक्षेपूर्वी आयोजित करण्यात येणार आहे. जेणेकरून या विद्यार्थ्यांपैकी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना हिवाळी सत्र २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरण्याची संधी उपलब्ध होऊ शकेल. याकरिता जुलै २०२० च्या प्रथम ते अंतिमपूर्व परीक्षांच्या निकालानंतर Performance Improvement साठी इच्छुक विद्यार्थ्यांकडून ते इच्छुक असलेल्या लेखी परीक्षेच्या विषयाचे (Theory Exam) परीक्षा अर्ज खालील नियमांच्या अधिन राहून नव्याने भरण्याबाबत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात यावे.

१) Performance Improvement साठी सदर परीक्षा अर्ज भरताना ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरलेले आहेत व विद्यार्थ्यांच्या ज्या विषयांना गणितीय सुत्रांचा वापर करून गुण प्रदान करण्यात आलेले आहेत, त्याच विषयांना Performance Improvement ची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.
२) सदर Performance Improvement च्या परीक्षेकरिता कोणतेही परीक्षा शुल्क आकारण्यात येणार नाही.
३) उन्हाळी २०२० च्या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच (Fresh) परीक्षा अर्ज केले आहेत व ज्यांचे गुणदान हे गणितीय सुत्रानुसार करण्यात आलेले आहे फक्त अशाच विद्यार्थ्यांना कमीत कमी एक व जास्तीत जास्त सर्व लेखी परीक्षेच्या (Theory) विषयांकरिता परीक्षा अर्ज भरता येतील.

२..

४) सदर परीक्षा अर्ज भरून देण्यासाठी कालावधी खालील प्रमाणे असेल :
   अ) ज्या परीक्षांचे निकाल दि. ३१.०७.२०२० पर्यंत जाहीर झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज स्वीकारण्याची मुदत दि. ०६.०८.२०२० ते १६.०८.२०२० (दहा दिवस).
   ब) ज्या परीक्षांचे निकाल दि. ०५.०८.२०२० नंतर जाहीर करण्यात येतील, त्यांच्यासाठी अर्जांची मुदत निकाल जाहीर झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी सुरू होऊन पुढील दहा दिवस अशी राहील.

५) सदर परीक्षा अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची Performance Improvement ची परीक्षा झाल्यानंतर त्यांना मिळालेले गुण/निकाल हे त्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अंतिम गुण/निकाल समजण्यात येईल.

६) सदर परीक्षेस "Special Examination" ची सुविधा लागू राहणार नाही.

७) जे विद्यार्थी Performance Improvement करता अर्ज करतील त्यांना उन्हाळी २०२० चे गणितीय सुत्रानुसार गुणदान केलेले गुणपत्रक न देता Performance Improvement ची परीक्षा झाल्यानंतर तयार होणाऱ्या निकालानुसार एकच गुणपत्रक देण्यात येईल.

८) जे विद्यार्थी Performance Improvement च्या परीक्षेमध्ये ज्या विषयाची निवड करणार नाहीत. त्यांचे त्या विषयाचे पूर्वीचे (गणितीय सुत्रानुसार निश्चित केलेले) गुण ग्राह्य धरण्यात येतील.

९) सदर Performance Improvement च्या परीक्षेकरिता अभ्यासक्रम खालील प्रमाणे राहील :

**Syllabus for the performance improvement examinations:**

**A. Professional Programs/ Conventional PG Programs:**

Performance improvement examinations of Theory Subject of interested students for even semesters of first to pre final year will be conducted on the basis of the syllabus completed up to 13th March, 2020.

**B. Conventional Programs:**

The performance improvement examination of theory subjects of the first to pre-final year students enrolled for the conventional programs will be conducted on the basis of १००% syllabus, as syllabus for such programs is already completed before the start of lockdown.

सदर पत्राचा आशय आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावा व इच्छुक विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज विहीत मुदतीमध्ये भरण्याबाबत सूचित करण्यात यावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ